ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ पुणें, बुधवार तारीख १० ऑक्टोबर, १९५६ अंक ४१

## विविध माहिती

**उत्तर प्रदेशांत किरणोत्सर्गी पाऊस**—बनारस विद्यापीठाच्या शास्त्रीय खात्यानें केलेल्या निरीक्षणावरून असें दिसून आलें आहे कीं उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागांत पडलेला पाऊस बऱ्याच प्रमाणांत किरणोत्सर्गी होता. अणु बॉम्ब व हैड्रोजन बॉम्ब ह्यांच्या स्फोटामुळें वातावरणाच्या दाबांत फार मोठे फेरफार होतात त्यामुळें शेंकडों मैल दूर अंतरावर असा पाऊस पडूं शकतो.

**मुंबई-दिल्ली नवीन गाडी**—मुंबई ते दिल्ली ह्या मार्गावर धावणारी नवीन गाडी पश्चिम रेल्वे लवकरच सुरू करणार आहे. ह्या गाडींतील सर्व डब्यांतून हवामान सुखद राखण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें १९५७ च्या एप्रिलपासून अहमदाबाद ते दिल्ली ह्या अरुंद रुळाच्या मार्गावर एक जनता एक्सप्रेसहि चालू करण्यांत येणार आहे.

**चीन व भारत ह्यांचा व्यापार**—चीनकडून भारताला वृत्तपत्रांना लागणारा कागद आणि यंत्रसामुग्री निर्यात होण्याची शक्यता आहे. चीननें भारताकडून १९५४ सालीं जितका माल आयात केला होता त्यापेक्षा गेल्या सालीं ५ पट अधिक माल आयात केला. ह्याच काळांत चीननें भारताला निर्यात केलेल्या मालांत दुपटीनें वाढ झाली आहे.

**दुय्यम शिक्षणासाठी कर**—आंध्र राज्यांतील जिल्हाबोर्डांतर्फे चालविल्या जाणाऱ्या दुय्यम शिक्षणाच्या शाळांना अधिक मदत देतां यावी म्हणून आंध्र सरकार कर बसविण्याचा विचार करीत आहे. प्राथमिक शाळा चालविण्यासाठी अशा प्रकारचा कर सध्यां घेण्यांत येत आहेच. नवा कर बसविण्यासाठीं संबंधित कायद्यांत दुरुस्ती करावी लागेल.

**१६७ वर्षांचा वृद्ध**—कोलंबिया राज्यांतील पेरिस नांवाच्या वृद्धाला न्यूयॉर्कमधील प्रसिद्ध वैद्यकीय संस्थेंत तपासणीसाठी आणलें होतें. हा वृद्ध आपलें वय १६७ असल्याचे सांगतो. अमेरिकन डॉक्टर्सनीं त्याची वैद्यकीयदृष्ट्या तपासणी करून त्याचें वय १५० पेक्षा जास्त असल्याची खात्री दिली. ह्या वृद्धाची उंची ४ फूट, ४ इंच आहे. त्याचें हृदय चांगल्या स्थितींत आढळून आलें.

**भारतीय प्राध्यापकाला बक्षीस**—भारतामधील खरगपूर तांत्रिक शिक्षणाच्या संस्थेंत काम करणारे रसायनशास्त्राचे प्राध्यापक श्री. अजयकुमार बोस ह्यांना शास्त्रीय विषयावरील निबंधाच्या स्पर्धेत ७५ पौंडांचें बक्षिस मिळालें आहे. ही स्पर्धा शास्त्रीय संशोधन करणाऱ्यांच्या साठी 'लंडन टाईम्स' नें लावली होती. पहिलें १५० पौंडांचें बक्षीस एका ब्रिटिश संशोधकाला मिळालें.

**निवडणुकीसाठी मतपत्रिका**—१९५७ च्या फेब्रुआरी-मार्च महिन्यांच्या सुमारास भारतामधील दुसरी सार्वत्रिक निवडणूक होईल. भारतीय सरकारच्या निवडणूक कमिशनरनें नाशिक येथील छापखान्यांत ५१ कोटी मतपत्रिका छापण्याची मागणी नोंदविली आहे. मतपत्रिकांचा हा पहिला हप्ता आहे.

**इजिप्तला कर्ज**—कॅनडापासून गहूं विकत घेण्यासाठी इंटरनॅशनल मॉनेटरी फंडानें इजिप्तला १·५ डॉलर्सचें कर्ज दिलें आहे. फंडाला इजिप्तकडून जितकें सोनें वर्गणी म्हणून मिळालें आहे, त्याच्या तारणावर कर्ज देण्यांत आलें आहे. नियमाप्रमाणें इजिप्तनें ३ वर्षांत कर्जाची फेड करावयाची आहे. तथापि, जास्तींत जास्त ५ वर्षांत फेड करण्याची सवलत आहे.

**तेलगू ज्ञानकोष**—तेलगू भाषेतील पहिल्या ज्ञानकोषाच्या कार्याला प्रारंभ झाला आहे. हें काम संग्रह आंध्र विज्ञान कोष समिति ह्या संस्थेनें हातीं घेतलें असून पहिल्या खंडाचें साहित्य छपाईसाठी तयार झालें आहे. सर्व ज्ञानकोष मिळून ६ खंड होतील, व त्यासाठी ३ लाख रुपये खर्च येईल. पहिला खंड पुढच्या वर्षाच्या एप्रिलमध्यें प्रसिद्ध होईल.

**स्वातंत्र्यशहीदांचीं स्मारकें**—१८५७ सालानंतरच्या काळांत भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्या देशभक्तांनीं आपले प्राण खर्ची घातले त्यांचीं स्मारकें उभारण्याची एक योजना उत्तर प्रदेश सरकारनें तयार केली आहे. ह्या योजनेसाठी ८ लाख रुपये खर्च येईल. भारतीय सरकारहि देशाच्या निरनिराळ्या भागांत अशींच स्मारकें उभारणार आहे.

**यंत्रसामुग्रीचें तरतें प्रदर्शन**—जपानमधील यंत्रसामुग्रीचें तरतें प्रदर्शन घेऊन एक जपानी बोट पुढील सालच्या जानेवारी महिन्यांत सीलोनला जाणार आहे. प्रदर्शनासाठी वापरण्यांत येणाऱ्या ८,००० टन वजनाच्या बोटींत जरूर ते फेरफार करण्यांत आले आहेत. प्रदर्शनांत औद्योगिक व शेतीविषयक यंत्रसामुग्री असेल. प्रदर्शन आग्नेय आशिआंतील आणखी कांहीं देशांनाहि पाठविण्यांत येईल.

**निग्रोंना विमानांतील नोकऱ्या**—न्यूयॉर्क शहरांतील विमानतळांचा उपयोग करणाऱ्या १८ अमेरिकन विमान कंपन्यांनीं आपल्या विमानांतून निग्रो लोकांना नोकऱ्या देण्याच्या प्रश्नाचा विचार चालविला आहे. सध्यां अमेरिकेंतील एकाच कंपनींत फक्त एकच निग्रो वैमानिक आहे आणि तोहि मालाची वहातूक करणारें विमान चालवितो. विमानविषयक नोकरांची भरती फक्त लायकीप्रमाणें करण्याचा वरील कंपन्यांचा विचार आहे.

## युनेस्कोचें दिल्ली येथील ९ वें अधिवेशन

संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या शैक्षणिक, शास्त्रीय व सांस्कृतिक उपसंघटनेचें ९ वें अधिवेशन दिल्ली येथें पुढील महिन्याच्या पांच तारखेपासून भरणार आहे. अधिवेशनासाठी राजधानींत तयारीची घामधूम चालू झाली आहे. अधिवेशनाला येणारे प्रतिनिधी आणि युनेस्कोचे अधिकारी भारताचे पाहुणे म्हणून येणार आहेत. अर्थातच त्यांची सर्व व्यवस्था चोख ठेवण्याची खबरदारी भारतीय सरकार घेत आहे. आशिआंत इतकी मोठी आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यांत येण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. अधिवेशनाचें कामकाज नोव्हेंबर ५ पासून डिसेंबर ६ पर्यंत, म्हणजे तब्बल एक महिनाभर चालणार आहे. फक्त नोव्हेंबर १७ ते १९ हे तीन दिवस विश्रांति घेण्यांत येणार आहे. अधिवेशनाला प्रतिनिधी व निरीक्षक मिळून ७३ राष्ट्रांचे सुमारें १,००० लोक उपस्थित राहतील असा अंदाज आहे. परिषदेसाठी बांधण्यांत येत असलेल्या भव्य सभामंदिराचें काम आतां पूर्ण झालें आहे. त्याचप्रमाणें वसतिगृहहि तयार झालें आहे. अधिवेशनाला येणारांची रहाण्याची सोय करण्यासाठी जितकी म्हणून जागा मिळेल तितकी नोंदवून ठेवण्यांत आली आहे. दिल्लीमधील निरनिराळ्या हॉटेल्समधून व इतर कांहीं इमारतींमधून सुमारें ९०० खोल्या आतांच नोंदवून ठेवण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय सरकारी मालकीच्या १०० जागा राखून ठेवल्या आहेत. अधिवेशनाला येणाऱ्या लोकांना वैद्यकीय मदत देण्याची सोय करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें त्यांना पोस्टाची व बँकेची सोयहि करून देण्यांत येणार आहे.

---

## दी पूना अर्बन को. बँक लि. पुणें

वरील बँकेची, दिनांक ३०–९–५६ रोजीं वार्षिक साधारण सभा झाली. या सभेंत सन १९५६–५७ सालाकरतां खालील पदाधिकारी निवडून आले.

**सल्लागार मंडळ**—( १ ) मा. दत्तात्रय बळवंत इनामदार, अध्यक्ष, ( २ ) मा. गोपाळ लक्ष्मण थत्ते, ( ३ ) मा. किसन लक्ष्मण बारणे, ( ४ ) मा. जगन्नाथ विष्णू भोसले, ( ५ ) मा. नामदेव अनंता सुकाळे, सभासद.

**कार्यकारी मंडळ**—( १ ) मा. नरहर भाऊराव कुलकर्णी, चेअरमन, ( २ ) मा. व्यंकटेश नागेश पोळ व्हॉ. चेअरमन, ( ३ ) मा. दिगंबर विष्णू इनामदार, ( ४ ) महादेव भाऊराव शेळके, ( ५ ) मा. डॉ. देविदास त्र्यंबक विसाळ, एल्. सी. पी. एस. ( ६ ) रणछोड पांडुरंग भोंडे, बी. ए., एलएल. बी. वकील ( ७ ) मा. लक्ष्मण धर्माजी ढुंबरे, ( ८ ) मा. वसंत लक्ष्मण गोसावी, ( ९ ) मा. मारुती मल्हारराव पवार, सभासद.

**हिशोबतपासनीस**—( १ ) मा. गोपाळ दत्तात्रय आपटे सी. ए.

---

## पुणें सें. को. बँकेचें संचालक मंडळ

पुणें सेंट्रल को–ऑप. बँक लि. ची साधारण सभा शनिवार दिनांक २९–९–५६ रोजीं होऊन त्यांत सन १९५६–५७ करतां खालीलप्रमाणें संचालक मंडळ व ऑडिटर्स निवडून आले.

( १ ) रा. ना. वि. पांडव, अध्यक्ष.
( २ ) रा. य. बा. सावंत, इनामदार, उपाध्यक्ष.
( ३ ) रा. गो. पां. पवार, ( सासवड )
( ४ ) रा. शं. बा. इनामके ( दौंड ).
( ५ ) रा. रा. बा. पवार ( शिरूर ).
( ६ ) रा. सा. मा. सातकर ( खेड ).
( ७ ) रा. तु. शं. पाटील ( इंदापूर ).
( ८ ) रा. भि. स. तावरे ( बारामती ).
( ९ ) रा. शि. म. काळे ( जुन्नर ).
(१०) रा. द. ल. पारखी ( अर्बन पुणें शहर ).
(११) रा. कि. रा. पाटसकर ( अर्बन पुणें शहर सोडून ).
(१२) रा. वा. ब. गोगटे
(१३) रा. वि. त्रिं. टिळक
(१४) रा. वि. क. तुळशीबागवाले
(१५) रा. वि. ज. करंदीकर
(१६) रा. दि. वि. इनामदार
(१७) रा. र. वा. जोशी
} व्यक्तिशः सभासदांतर्फे
(१८) रा. वा. ग. अळतेकर, कार्यकारी संचालक ( पदसिद्ध ).

**ऑडिटर्स**

( १ ) रा. गो. द. आपटे.
( २ ) रा. रा. कृ. देशपांडे.


# चित्रमयजगत्‌चा
—ललित साहित्यानें नटलेला—
# —दीपावली विशेषांक—
**१ नोव्हेंबर १९५६ रोजीं आकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध होईल.**

**या अंकांत**

◆ प्रा. माटे, ◆ प्रा. चिं. वि. जोशी, ◆ वि. वि. बोकील, ◆ अग्निहोत्री
◆ प्रा. अद्‌वंत ◆ डॉ. भट ◆ महादेवशास्त्री जोशी
इत्यादिकांच्या लघुकथा व
◆ श्री. ना. गो. चाफेकर, ◆ डॉ. वि. म. कुलकर्णी, ◆ दुर्गा भागवत, ◆ श्री. वा. काळे,
◆ प्रा. देशपांडे
प्रभृतींचे ललित लेख व कथासाहित्य येणार आहे.

— जाहिरातींचें उत्कृष्ट माध्यम —

किं. १ रुपया

मासिके विभाग,
चित्रशाळा प्रेस, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १० ऑक्टोबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## फळें व भाज्या टिकविण्याच्या सोयी

भारतीय सरकारच्या अन्न व शेतकी खात्याच्या डायरेक्टोरेट ऑफ मार्केटिंग अँड इन्स्पेक्शन ह्या विभागातर्फे पदार्थ गोठवून टिकविण्याच्या सोयींबद्दल एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं भारतांत दरसाल सुमारें १ कोटी टन फळें व भाज्या निर्माण केल्या जातात. पण ह्या उत्पादनापैकीं १५ ते २० टक्के माल त्या त्या प्रदेशांतच वायां जातो. कारण, मालाच्या वाहतुकींच्या व सांठवणुकीच्या योग्य त्या सोयी उपलब्ध नसतात. माल गोठवून किंवा अन्य मार्गें टिकविण्याच्या सोयी मुख्यतः उत्तर भारतांतच आहेत. सुमारें २० ते २१ लाख मण शेतीचा व इतर माल अशा रीतीनें टिकविण्याची व्यवस्था आहे. त्यापैकीं ८५ टक्के सोयी उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, पंजाब, पश्चिम बंगाल व ओरिसा ह्या राज्यांतून आहेत. ७० ते ८० टक्के सोयी बटाट्यांचें बियाणें टिकविण्यासाठी वापरल्या जातात. १० टक्के सोयी मासे टिकविण्यासाठी वापरल्या जातात, आणि उरलेल्या ४–५ टक्के सोयीच फळांच्या व भाज्यांच्या वांटणीला येतात. त्रावणकोर–कोचीन, आंध्र, आसाम, मद्रास व हैद्राबाद ह्या राज्यांतून पदार्थ गोठवून टिकविण्याच्या सोयी जवळजवळ नाहींतच. ज्या थोड्या ठिकाणीं अशा प्रकारची व्यवस्था आहे तीहि पुरेशी नाहीं. कारण, निरनिराळे पदार्थ गोठविण्याच्या कामीं जें तांत्रिक ज्ञान लागतें तें असलेला नोकरवर्ग नाहीं. शिवाय ह्या पद्धतीचा फायदा करून घेण्यासाठीं ग्राहकांत जो प्रकार पाहिजे त्याचीहि उणीव दिसून येते. ह्या बाबतींत तांत्रिक सल्ला देण्यासाठी तंत्रज्ञाची व्यवस्था करावी अशी सूचना करण्यांत आली आहे.

---

## चीनचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम

चीनच्या सरकारनें आखलेल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत औद्योगिक विकासाला प्राधान्य देण्यांत आलें आहे. तथापि हा विकास साधतांना अणुशक्तीचा उपयोग आणि स्वयंचलित कारखान्यांची उभारणी ह्या गोष्टींकडे इतर बाबींपेक्षा अधिक लक्ष पुरविण्यांत आलें आहे. भारताप्रमाणेंच चीन हा देशहि शेतीप्रधान असल्यानें चीनमधील संपत्तीचा खरा व परंपरागत झरा म्हणजे शेती हाच आहे. अर्थातच, औद्योगीकरणाचा कार्यक्रम अमलांत आणतांना शेतीच्या यशाकडे नजर लावणें अगत्याचें होऊन बसलें ? चिनी सरकारला ह्या गोष्टीची जाणीव असून शेतीच्या यशापयशावरच औद्योगिक विकासाचें यशापयश अवलंबून आहे. ह्या मुद्यावर खास जोर देण्यांत आलेला आहे. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला १९५८ मध्यें सुरवात होणार आहे. चीनमधील शेतीचें यांत्रिकीकरण करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे. शेतीचें यांत्रिकीकरण झाल्यामुळें चीनमधील पेट्रोलच्या खपांत खूपच वाढ होणार आहे. त्यामुळें १९६२ सालापर्यंत पेट्रोलचें उत्पादन ५० ते ६० लाख टनांपर्यंत वाढविण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. १९५७ पर्यंत खनिज तेलाचें उत्पादन २० लाख टनांपर्यंत वाढविण्याचें ठरविण्यांत आलें आहे. नव्यानें उघडण्यांत येणाऱ्या तेलाच्या खाणींकडे जाण्यासाठी नवे रेल्वेचे मार्ग बांधण्याचें ठरलें आहे. ५ वर्षांच्या अवधींत सुमारें ५,००० मैल लांबीचे नवे रेल्वेमार्ग आणि १०,००० मैल लांबीचे मोटारी जाण्याचे हमरस्ते बांधण्याचा सरकारचा इरादा आहे. भारी उद्योगधंद्यावर जोर देण्याचें धोरण असल्यामुळें १९६२ सालापर्यंत पोलादाचें उत्पादन १·२ कोटी टनापर्यंत वाढविण्यांत येईल.

---

## आग्नेय आशिआंतील मलेरिआविरुद्ध मोहीम

जागतिक आरोग्य संघटनेच्या आग्नेय आशिआविषयक समितीचें ९ वें अधिवेशन दिल्ली येथें भरलें होतें. ह्या अधिवेशनांत आग्नेय आशिआंतील मलेरिआच्या रोगाविरुद्ध करावयाच्या मोहिमेचा तपशीलवार विचार करण्यांत आला आणि तिला तात्त्विक मान्यता देण्यांत आली. १९६१ सालअखेर ह्या भूभागांतील हिंवतापाच्या रोगाचा संपूर्णपणें नायनाट करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. संघटनेचे सभासद असलेल्या राष्ट्रांकडून मिळणारी वर्गणी ही ह्या कामासाठी लागणाऱ्या निधीची एक बाब आहे. त्याशिवाय संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या उपसंघटनांकडूनहि कांहीं आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. हिंवतापविरोधी मोहिमेच्या आवश्यकतेविषयीं सर्वच सभासद–राष्ट्रांचें एकमत झालें. पण तीसाठी लागणाऱ्या निधीबद्दल मात्र बऱ्याच राष्ट्रांनीं चिंता व्यक्त केली. भारताचे प्रतिनिधी डॉ. जसवंतसिंग म्हणाले, कीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारतीय सरकारनें ह्या रोगाविरुद्ध उपाययोजना करण्यासाठी २७ कोटी रु. मंजूर केले आहेत. सध्यां हिंवतापाच्या साथी मर्यादेंत ठेवण्याचेंच काम मुख्यतः करण्यांत येत आहे. ह्या रोगाचें संपूर्णपणें उच्चाटन करण्याचे उपाय योजावयाचें झाल्यास आणखी २३ कोटी रु. खर्च करावे लागतील. इतकी जादा रक्कम खर्च करण्याची ऐपत भारतीय सरकारला आज नाहीं. त्यासाठी सरकारला देशाबाहेरून येणाऱ्या आर्थिक मदतीची जरूरी आहे. जरूर तितका पैसा मिळाला तर येत्या ५–६ वर्षांच्या कालांत भारतामधील ह्या रोगाचें ठाणें कायमचें उठवितां येईल, असा विश्वास वाटण्यासारखी परिस्थिति आहे.

---

**विजापूर येथें सहकारी गिरणी** —विजापूर को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल असोसिएशननें विजापूर येथें सुताची सहकारी गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. गिरणीसाठी असोसिएशननें १० लाख रुपयांचें भांडवलहि जमा केलें आहे. भारतीय सरकारनें कर्नाटकांतील गिरण्यासाठी २५,००० चात्या मंजूर केल्या आहेत. विजापूर येथील गिरणीसाठी आणखी १२,५०० चात्या मिळाव्या अशी मागणी करण्यांत येणार आहे.

## कमी मिळकतीच्या लोकांसाठी घरें बांधण्यासंबंधीच्या योजनेखाली घरबांधकाम

### अटी सढळ केल्या

कमी मिळकतीच्या लोकांसाठी घरें बांधण्यासंबंधीच्या योजनेखाली व्यक्तींना व संस्थांना जीं कर्जें देण्यांत येतात त्याबाबतच्या अटी सढळ करण्यांत आल्या असून त्यानुसार सदरहू योजनेखाली बांधावयाच्या गाळ्यांमध्यें किमान जागेबाबतची जी मर्यादा ठरवून देण्यांत आली आहे ती कमी करण्यांत आली आहे. दुरुस्त नियमान्वयें अशा गाळ्यांमध्यें राहण्यासाठी किमान एक खोली व एक स्वयंपाकघर असलें पाहिजे आणि अशा जागेचें एकूण क्षेत्रफळ किमान २२० चौरस फूट असलें पाहिजे. यापूर्वीच्या नियमाप्रमाणें किमान क्षेत्रफळ ३८० चौरस फूट असलें पाहिजे अशी अट होती. जागेबाबतची १२०० चौरस फूट ही कमाल मर्यादा पुढेंहि चालू राहील.

ज्या जागेवर गाळा बांधण्यांत आला असेल ती जागा भाडेपट्ट्यानें देण्याबाबतचा नियमहि शिथिल करण्यांत आला आहे. दुरुस्त नियमानुसार भाडेपट्ट्याची मुदत किमान २० वर्षें असावी. तथापि, ही मुदत कर्जफेडीच्या मुदतीपेक्षा किमान १० वर्षें अधिक इतकी असावी. पूर्वीच्या नियमांत भाडेपट्ट्याची मुदत ९९ वर्षें असावी असें ठरविण्यांत आलें होतें.

नियमानुसार गाळ्याच्या अंदाजी खर्चाच्या ७० टक्क्यांपर्यंत किंवा ज्या जागेवर गाळा बांधावयाचा असेल ती जागा खरेदी करण्यांत आली असेल तर अशा बाबतींत गाळ्याचा अंदाजी खर्च आणि जमीन खरेदी करण्यासाठी दिलेली प्रत्यक्ष किंमत या दोन्हींच्या ७० टक्क्यांपर्यंत कर्ज देतां येतें. मात्र या दोन्ही बाबतींत मिळकतीनुसार केलेल्या निरनिराळ्या गटांतील लोकांना जास्तींत जास्त पुढीलप्रमाणें कर्ज मिळूं शकेल:—

वार्षिक २४०० रुपयांपर्यंत उत्पन्न असणारे (रु.५,०००); वार्षिक २,४०१ ते ३,६०० (रु. ६,०००); वार्षिक ३,६०१ ते ४८०० (रु. ७,०००) आणि रु. ४,८०० ते रु. ६,००० (रु. ८,०००). ज्या व्यक्तींचें वार्षिक उत्पन्न ६,००० रुपयांपेक्षा अधिक असेल त्यांना कर्ज दिलें जाणार नाहीं.

ज्या जागेवर गाळा बांधावयाचा असेल ती जमीन ज्या जिल्ह्यामध्यें असेल त्या जिल्ह्याच्या कलेक्टरांकडे कर्जासाठी अर्ज केले पाहिजेत. नियमांच्या छापील प्रती आणि अर्जाचे फॉर्म कलेक्टरांच्या कचेरींत मिळूं शकतील. तसेंच या प्रती व फॉर्म गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, चर्नी रोड गार्डन, मुंबई येथेंहि मिळूं शकतील. त्यांची किंमत प्रतीला अनुक्रमें ३ आणे आणि १ आणा अशी आहे.

---

**डोळ्यांवरील उपचारांचें इस्पितळ**—भुजपासून ३६ मैलांवर असलेल्या मांडवी ह्या गांवीं डोळ्यांवरील उपचारांचें एक इस्पितळ उघडण्यांत आलें आहे. इस्पितळांत १५ रोग्यांची सोय आहे. इमारतीसाठी एका धर्मादाय संस्थेनें १ लाख रुपयांची देणगी दिली होती.

## महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद्

**निमंत्रक : महाराष्ट्र चेंबर; अध्यक्ष : श्री. ध. रा. गाडगीळ**

राज्यकारभाराच्या दृष्टीनें मुंबई, हैद्राबाद व मध्यप्रदेश या प्रदेशांत विभागलेली मराठी जनता प्रथमच नव्या मुंबई राज्यांत एकत्रित येत आहे. यामुळें या प्रदेशांतील सर्व जिल्ह्यांतील व्यापारी व कारखानदार वर्गाच्या प्रतिनिधींची एक परिषद् घ्यावी व या एकत्र आलेल्या सर्व मराठी प्रदेशाच्या अभ्युदयाची योजना तयार करावी; या विभागांतील अविकसित भागांचा प्राधान्येंकरून विचार करावा; सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सुचविलेल्या विकासयोजनांचा परामर्श घ्यावा; मराठी प्रदेशाची सर्वसाधारण आर्थिक व औद्योगिक पाहणी करावी; लहान व मोठे उद्योगधंदे यांची शक्यता, सद्यःपरिस्थिति व वाढ यांचा विचार करावा; शेतकी, खनिज व जंगल संपत्तीचा व त्यांच्या विनियोगाचा व विकासाचा अभ्यास करावा; रेल्वे–रस्ता व नाविक वाहतुकीची परिस्थिति यांचा अंदाज घ्यावा; भांडवलाची उभारणी व्यापारी व तांत्रिक शिक्षणाची सोय पाहावी—या व तदनुषंगिक गोष्टींचा विचारविनिमय करावा, या उद्देशानें परिषदेची आखणी करण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार ज्या विकासाच्या गोष्टी सुचविण्यांत आल्या आहेत त्यांनाहि यामुळें चालना मिळेल अशी चेंबरला आशा वाटते.

या आठव्या महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेचें अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं स्वीकारण्याचें मान्य केलें आहे. परिषद् मुंबई येथें नोव्हेंबरच्या अखेरीस अगर डिसेंबरच्या सुरुवातीस घेण्याचें योजिलें आहे.

---

**तेल शुद्ध करण्याचा कारखाना**—भारतीय सरकार आपल्या मालकीचा तेल शुद्ध करण्याचा आणखी एक कारखाना काढण्याच्या विचारांत आहे. कारखान्यांत दरसाल १५ ते २० लाख टन तेल शुद्ध करण्याची यंत्रसामुग्री बसविण्यांत येईल. भारतांतील अशा प्रकारचे सध्यां चालू असलेले कारखाने दरसाल ४५ लाख टन तेल शुद्ध करूं शकतात.

**झाशीच्या राणीचें स्मारक**—झाशी येथें भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धांतील शौर्यशाली ललना, झाशीची राणी लक्ष्मीबाई हिचें स्मारक करण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. एका तळ्यांत घोड्यावर बसविलेला राणीचा पुतळा उभारण्यांत येईल. तिच्या पाठीशीं एक मूलहि बांधलेलें दाखविण्यांत येईल. भोंवतालच्या ८ एकरांत बाग करण्यांत येईल.

**जामनगर म्युनिसिपालिटीचें उत्पन्न**—जामनगर म्युनिसिपालिटीच्या हद्दींत दरडोई अवघा ११ रुपये कर आहे. त्या भागांतील इतर कांहीं म्युनिसिपालिट्यांतून तो १४ ते १६ रु. आहे. जामनगर म्युनिसिपालिटीनें आपला वाढता खर्च भ[illegible] विण्यासाठी करांत वाढ करावी असें सुचविण्यांत आलें आहे.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# आंध्र राज्यांतील ग्रामीण विभागांतील सहकारी चळवळ

लेखक :—श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.,
C/o को–ऑप. ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

[ टीप—आंध्र राज्यांतील सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार श्री. के. सुब्रह्मण्यम् नायडू एम्. ए., आय. ए. एस्., यांच्या 'मद्रास जर्नल ऑफ को–ऑपरेशन' या मासिकांतील लेखाच्या आधारें हा लेख तयार करण्यांत आलेला आहे. ]

भारतांत सहकारी चळवळ सर्वत्र एकाच वेळीं सुरू झालेली असली तरी तिची वाढ सर्व राज्यांत सारख्याच प्रमाणांत झालेली नाहीं. मुंबई, मद्रास व आंध्र या राज्यांत या चळवळीनें बरेंच क्षेत्र व्यापलेलें आहे. मद्रास व आंध्र हीं राज्यें सहकारी चळवळीच्या बाबतींत आघाडीवर आहेत. सहकारी संस्थांची विविधता या राज्यांत जास्त प्रमाणांत आहे. त्यादृष्टीनें आपल्या मुंबई राज्यांत सहकारी चळवळीचें क्षेत्र किती व्यापक प्रमाणांत वाढलें पाहिजे याची कल्पना यावी या उद्देशानें सदरचा लेख लिहिण्यांत आलेला आहे.

आंध्र राज्यांत शेतीव्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय आहे. शेंकडा ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. साहाजिकच जनता गरीब असल्याकारणानें कर्जपुरवठा वेळेवर व योग्य त्या प्रमाणांत झाला तर शेतकरी योग्य तें उत्पादन जमिनींतून काढूं शकतो. सहकारी चळवळीपूर्वी सरकार व व्यापारी यांच्याकडून पतपुरवठा होत होता. अद्यापहि कांहीं प्रमाणांत तो चालू आहे. शेतकऱ्यांना वर्षाकांठीं लागणाऱ्या कर्जपुरवठ्यापैकी अवघा शेंकडा ३·१ टक्का कर्जपुरवठा सहकारी सोसायट्यांमार्फत होतो असा निष्कर्ष अ. भा. ग्रामीण पतपुरवठा पहाणीसमितीनें काढला आहे. तथापि आंध्र राज्यांत हें प्रमाण शेंकडा ९ टक्के आहे.

आंध्र राज्यांतील सहकारी चळवळीचें स्वरूप पुढील आंकडे-वारीवरून लक्षांत येईल. सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ११,००० आहेत. सभासदसंख्या १४·२२ लाख असून खेळतें भांडवल ३५ कोटी रुपये आहे.

ग्रामीण जनतेला पतपुरवठा करण्याच्या बाबतींत हें राज्य आघाडीवर आहे. ग्रामीण सोसायट्यांची संख्या ६,५०० असून सभासदांची संख्या ५·८९ लाख आहे. राज्यांतील ५५ टक्के खेडीं व १७ टक्के ग्रामीण जनता सहकारी क्षेत्रांत सामावलेली आहे. सोसायट्यांचें वसूल झालेलें भांडवल ८६ लाख रुपये असून खेळतें भांडवल ६ कोटी रुपये आहे. कर्जावरील व्याजाचा दर शें. ६½ टक्क्यापेक्षा जास्त नाहीं.

ग्रामीण जनतेला काटकसरीची संवय लागावी, पैशाचा विनि-योग योग्य त्या तऱ्हेनें व्हावा व कांहीं लोकांना पैसा स्वतः-जवळ सांठवून ठेवण्याची जी संवय असते ती नष्ट व्हावी या हेतूनें ग्रामीण बँका स्थापन करण्यांत आलेल्या आहेत. आंध्र राज्यांत निवडक ठिकाणीं स्थापन करण्यांत आलेल्या ग्रामीण बँकांची संख्या १२ आहे. त्यांची उभारणी भरभक्कम शेअर भांडवल, भरपूर स्थानिक ठेवी व चोख व्यवस्था यावर झालेली आहे. या बँका अल्प मुदतीचीं व दुय्यम मुदतीचीं कर्जें देतात. त्याप्रमाणें सोनें-चांदीच्या दागिन्यावर व अन्नधान्याच्या तारणावर कर्जें दिलीं जातात. ग्रामीण विभागांत दडून राहिलेल्या पैशांचा एकत्र सांठा करून त्यांचा विनियोग योग्य त्यावेळीं ( मोसम सुरू असतांना ) बीं-बियाणें, अवजारें यांच्या खरेदीसाठी कर्ज-पुरवठा करणें मुख्य उद्देश ग्रामीण बँकांच्या स्थापनेमागें आहे व तो हळु हळु यशस्वी होत आहे.

विहिरी खोदणें, तळीं बांधणें, पंपिंग सेटस् खरेदी करणें, इले-क्ट्रिक मोटर्स इ. खरीदण्यासाठीं शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचीं कर्जें दिलीं जातात. त्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या प्राथमिक लॅण्ड मार्गेज बँकांची संख्या ५७ आहे. कर्जाच्या परतफेडीची मुदत १० ते २० वर्षें ठेवण्यांत आलेली आहे. अन्नधान्य उत्पादन व शेतीविकास याच कारणाकरितां कर्जें दिलीं जातात. गेल्या वर्षी ४८ लाख रुपये या कारणाकरितां कर्जाऊ देण्यांत आले.

शेतकऱ्यांनीं पिकविलेला माल सहकारी संस्थेमार्फतच विकला गेला तर त्यांना योग्य तो मोबदला मिळूं शकेल व त्यांचें राहणी-मान सुधारण्यास मदत होईल. त्यासाठी या राज्यांत १५० खरेदी-विक्री सहकारी सोसायट्या आहेत सन १९५४–५५ सालीं अन्न-धान्यांच्या तारणावर या सोसायट्यांनीं १ कोट रुपये कर्जाऊ दिले व शेतकऱ्यांना २२,८०० टन खताचा पुरवठा केला. गेल्या दोन वर्षांपासून सरकारच्या उत्तेजनामुळें व जरूर त्या सहकार्यानें शेतीचा माल निर्यात करण्यांत येत आहे. नुकतीच १,३०० टन मिरची व २,७०० टन कांदे यांची निर्यात शेतकऱ्यांनीं स्वतःच्या सहकारी सोसायट्यांमार्फत केलेली आहे हें सहकारी चळवळीला भूषणावह नाहीं असें कोण म्हणेल ? शेतकऱ्यांसाठी गुदामे व वेअरहउसेस यांची सोय सरकार व सहकारी संस्था यांच्या परस्पर सहकार्यानें केली जात आहे. शेतकऱ्यांची होणारी कुचंबणा नष्ट होत आहे.

आंध्र राज्यांत १·१२ लाख एकर जमीन उसाच्या लागवडीखाली आणलेली आहे. आर्थिक टंचाईमुळें शेतकरी आतांपर्यंत गूळ उत्पादन करीत होते. परंतु आतां सहकारी चळवळीमुळें साखर-कारखाने स्थापन करण्यांत येत आहेत. विशाखापट्टम् जिल्ह्यांत एतिकोप्पाका सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यांत आलेला असून मोसमांत रोजीं ६०० टन ऊंस गाळला जातो. याप्रकारें आणखी ५ सहकारी साखर कारखाने सुरू करण्यांत यावयाचे आहेत.

हातमाग विणकर सोसायट्यांच्या बाबतींतसुद्धां हें राज्य आघाडीवर आहे. विणकरांच्या सहकारी सोसायट्यांची संख्या ६५९ आहे.

बऱ्याच ठिकाणीं दूधपुरवठा सहकारी संस्थांमार्फत केला जातो. दूध व दुधापासून तयार केलेले पदार्थ विकण्यासाठी २५९ दूध सहकारी सोसायट्या आहेत. मागील सालीं विक्री केलेल्या दुधाची व दूध पदार्थांची किंमत १३·८४ लाख रुपये होती.

जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठी १८ इरिगेशन सहकारी सोसायट्या आहेत. २५,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा केला जातो व त्यामुळें २,४४० शेतकऱ्यांना त्याचा फायदा सहकारी चळवळीमुळें मिळत आहे.

ज्यांना स्वतःच्या जमिनी नाहींत व ग्रामीण विभागांत जे बेकार आहेत, त्यांना उद्योगधंद्याला लावण्यासाठी सरकारचे मदतीनें २६ सोसायट्या सुरू करण्यांत आलेल्या आहेत. ३,००० शेतमजुरांनीं १२,७०० एकर पडीत जमीन लागवडीखाली आणलेली आहे. सहकारी सोसायट्या शेतमजुरांना खंडानीं जमिनी देतात व शेतमजूर व्यक्तिगत मशागत करून अन्नधान्यांचें उत्पादन करतो. ग्रामीण विभागांत अशा प्रकारच्या ८९९सोसायट्या असून त्यांनीं ६७,००० एकर जमीन व्यक्तिगत मशागतीसाठी शेतकऱ्यांना

संडांनीं दिलेली आहे. सहकारी शेतीचें आणखी नमुनेदार उदाहरण कोठें सांपडेल ?

कॉन्ट्रॅक्ट पद्धतीनें कामें करणाऱ्या मजुरांच्या ४४ सोसायट्या आहेत. सभासदांना बांधकामें, रंग देण्याचीं कामें, किरकोळ मोलमजुरीचीं कामें उपलब्ध करून देणें, हीं कामें लेबर कॉंट्रॅक्ट सोसायट्यांकडून केलीं जातात.

घरबांधणीच्या बाबतींत आंध्रांतील ग्रामीण विभाग थोडा मागें आहे. घरबांधणीच्या ३० ग्रामीण सहकारी सोसायट्या आहेत. त्यांची सभासद-संख्या १००० आहे. नॅशनल एक्स्टेन्शन सर्व्हिस ब्लॉक्सच्या कार्यपद्धतीनें या क्षेत्रांत प्रगति होत आहे.

या सर्व विवेचनावरून आंध्र राज्यामधील ग्रामीण विभागांत सहकारी चळवळीनें किती क्षेत्र व्यापलें आहे याची कल्पना येते. सहकारी चळवळीला जर सरकारकडून अडथळा झाला असता तर याप्रकारची प्रगति झाली नसती. सरकार आणि सहकार यांच्या समन्वयामुळें व संलग्न कार्यपद्धतीमुळें आंध्र राज्य आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी खटपट करीत आहे. भारतांतील इतर राज्यांनीं यांपासून योग्य तो बोध घेतला पाहिजे.

---

## नवीन १६५ साबण उद्योगकेंद्रें

तेल गाळणीची आणि साबण तयार करण्याचीं १६५ नवीन केंद्रें उघडून घरगुती उद्योगधंद्यांतून ४,००० कामगारांना काम पुरेल अशा कार्यक्रमासाठी मध्यवर्ती उत्पादनखात्यानें खादी ग्रामोद्योग मंडळास ४६ लाख, ४९ हजार रुपयांचें साहाय्य देण्याचें ठरविलें आहे. या नवीन धंद्यामुळें १ लाख कामगारांना दोन महिने काम मिळेल.

आजच्या आर्थिक वर्षांत, चालू व संकल्पित केंद्राच्या आवश्यकतेसाठी शिक्षणकार्यक्रम वाढविण्यांत येत असून १०० सुपरवायझर केमिस्टांना; या तेलगाळणीच्या केंद्रासाठी ३०० व्यवस्थापकांना; या दोनहि धंद्यांकरतां शिक्षित असे २०० उमेदवार तयार करण्यांत येणार आहेत. यासाठी २२,५०० रु. खर्च येईल. साबणधंद्याचें नाशिक विद्यालयांत केंद्र उघडण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणांत १०० शाळांतून शिक्षण घेण्यासाठी १०० शिक्षकांना शिक्षण देण्यांत येणार आहे. यासाठी वीस शिक्षण संस्थांना आर्थिक साहाय्य व साबणाच्या नव्या धंद्याच्यासाठी खाद्येतर तेलांचा उपयोग करण्याचें संशोधन-प्रयोग करण्याकरतां म्हणून २५,००० रुपये तरतुदींत ठेवले आहेत.

---

## काल्टेक्सचा तेल शुद्धिकरणाचा कारखाना

लवकरच विशाखापट्टमला एक नवीन तेल शुद्धिकरणाचा कारखाना सुरू करण्यांत येणार आहे. हा कारखाना बांधण्याचें कार्य काल्टेक्स ऑइल रिफायनिंग (इंडिया) लि. कडे आहे. यामुळें आंध्रच्या औद्योगिकरणाचा एक भाग पुरा होऊन त्याच्या मदतीसच नव्हे तर भारताची उत्तम पेट्रोलाची गरज भागेल असें म्हणावयास हरकत नाहीं. या कारखान्यांत वार्षिक ६७,५०,०० टन कच्चें तेल शुद्ध करण्यांत येईल. रोज स्पिरिट, केरोसीन, डिझेल, विमानांचें तेल मिळून १३,५०० बॅरल (४५ गॅलन प्रत्येकीं) शुद्ध माल तयार होईल. या कारखान्याच्या उभारणीला १२ कोट रु. खर्च येणार असून ३८० एकर जमीन या कारखान्याच्या संसाराला लागेल. सुमारें सहा हजार हिंदी कामगार या कारखान्याचें काम १९५७ सालापासून सुरू करणार आहेत.

## विशाल मुंबई राज्यांतील विदर्भ

विशाल मुंबईंत विदर्भाचे आठ जिल्हे समाविष्ट होणार आहेत. त्यांत अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चांदा, वर्धा, नागपूर, यवतमाळ हे जिल्हे असून त्यांचें आजचें क्षेत्रफळ ३,६१,८८० चौ. मैल आणि लोकसंख्या ७६,०७,०३८ एवढी आहे. या आठ जिल्ह्यांत ८ मोठीं शहरें; व ७५ साधारण स्वरूपाची व ३० नगरपालिका असलेलीं गांवें धरून एकूण गांवांची संख्या १२,४४८ आहे. ह्यापैकीं नागपूर शहरांतच कॉर्पोरेशन स्थापन झालेलें आहे. एकंदर ७६,०७,०३८ लोकसंख्येच्यामध्यें शेड्यूल्ड कॉस्टची १३,२७,६९२ आणि शेड्यूल्ड ट्राइब्सची संख्या १४,९९,८७ आहे.

या प्रदेशाचें स्वातंत्र्योत्तर कालांत महसूल उत्पन्न पुढीलप्रमाणें होतें :—

| साल | कोटी रुपये |
|---|---|
| १९४६–४७ | ५·३५ |
| १९४७–४८ | ५·५७ |
| १९४८–४९ | ६·९९ |
| १९४९–५० | ७·५७ |
| १९५०–५१ | ७·५९ |
| १९५१–५२ | ८·९४ |
| १९५२–५३ | ९·६० |
| १९५३–५४ | ९·९३ |

विदर्भाच्या या आठ जिल्ह्यांत एकूण २७३५ सहकारी संस्था आहेत. त्यांची सभासद संख्या २,००,९५८ एवढी आहे. त्यांचें एकंदर शेअर भांडवल ५१,८९,००० रुपये आहे.

लहान मोठे कारखाने ८६७ असून ७७,८६१ कामगार लोक त्यांत खपत आहेत.

श्री. वा. काळे, संपादक " अर्थ ", ह्यांचीं संग्राह्य पुस्तकें

**कण आणि क्षण**

"ह्या पुस्तकानें सुखी जीवनाची किल्लीच प्रत्येकाच्या हातीं दिली आहे." दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या.

आतां हिंदी अनुवाद होणार.

पृ. सं. १९८. किं. २॥ रु. ट. ख. ३ आ.

**पुढे पाऊल**

व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या विरोधीहि गरजांचा व हितसंबंधांचा मेळ कसा घालतां येईल, ह्याचें चित्ताकर्षक विवेचन.

२ ऑक्टोबर रोजीं प्रसिद्ध झालें.

पृ. सं. १३१ किं. १ रु. ट. ख. १ आणे.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर.

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} *मॅनेजिंग डायरेक्टर्स*



## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.



टेलिफोन नं. २४८३ "तारेचा पत्ता CENCOBANK"

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोंत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.

| | |
|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. १,७६,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,०७,९४,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

## मुंबई राज्यांतील जमीन-संरक्षणाचें कार्य

### ( २ )

### घळयांचा धोका

जेथें जेथें जमिनीचें नैसर्गिक संरक्षण नष्ट केलें जातें तेथें तेथें जमिनीची धूप होण्याचा धोका अधिक वाढतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पुष्कळदां शेतांतील पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था पुरेशी सुरक्षित नसल्यामुळें किंवा पाण्याचे पाट व्यवस्थितरीत्या न काढल्यामुळें तेथें घळया पडण्यास सुरुवात होते. तसेंच उतारावरील पाण्याचे प्रवाह किंवा पाणलोट यामुळेंहि घळया पडूं लागतात. तसेंच जमिनींचा निष्काळजीपणानें उपयोग करण्यानेंहि घळया पडतात. उंच जागेवरून पडणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळेंहि जमिनीची धूप होते.

आतां प्रश्न आहे तो असा, कीं घळया पडण्यास आपण प्रतिबंध करूं शकतों किंवा कसें ? आणि याचें उत्तर आपण प्रतिबंध करूं शकतों असें आहे. घळयावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा त्या पडूं नयेत अशी खबरदारी घेणेंच इष्ट असतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शेतीच्या चांगल्या पद्धतींचा स्वीकार करून शेतकऱ्याला या घळयांना पायबंद घालतां येतो. घळया पडण्यापूर्वी शीट धूप होते तेव्हां याबाबत प्रथम खबरदारी घेतली पाहिजे. जमिनीचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करतां येईल अशा रीतीनें शेतकऱ्यानें पुन्हां पुन्हां आपल्या शेताची आंखणी केली पाहिजे. ( १ ) अत्यंत उताराच्या जागीं लागवड करूं नये, ( २ ) चांगल्या जमिनीच लागवडीस आणाव्या, ( ३ ) मध्यम उताराच्या किंवा धूप झालेल्या जमिनींचा उपयोग कुरणें तयार करण्यासाठी करावा, ( ४ ) पुन्हां पुन्हां कुंपणें घालावीं आणि ( ५ ) शेत-जमिनींतील रस्त्यांची आंखणी योग्य तऱ्हेनें करावी.

उताराच्या जमिनींची धूप थांबविण्याचे जे कांहीं उत्कृष्ट मार्ग आहेत त्यांत पीकपाळी, जमिनीस आच्छादन पुरविणारीं पिकें लावणें, पट्ट्यापट्ट्याची लागवड करणें, उतारानुसार मशागत करणें किंवा आवश्यक तेथें टेरेसिंग करणें, या मार्गांचा समावेश होतो. त्याचप्रमाणें, रासायनिक खतें वापरल्यामुळें आणि मर्यादित प्रमाणांत गुरचराई करण्यामुळेंहि धूप थांबविण्यास मदत होते. शेतांतील जादा पाण्याचा योग्यप्रकारें निचरा होण्याची सोय केली पाहिजे. शक्य तेथें यासाठी नैसर्गिक निचऱ्याचा उपयोग करावा व घळया न पाडतां त्यांतून पाणी वाहून जाईल अशी दक्षता घ्यावी.

### मुंबई राज्याची प्रगति

जमीन संरक्षणविषयक कामांबाबत मुंबई सरकारनें १९४२ सालीं एक कायदा केला, आणि राज्याच्या पूर्व भागांत या कामाला सुरुवात करण्यांत आली. कारण या भागांत दुष्काळाची भीति असते. अहमदाबाद, विजापूर आणि सोलापूर हे ते जिल्हे होत. आतांपर्यंत सबंध राज्यांत मिळून सुमारें १२ लाख एकर क्षेत्राची बांधबंदिस्ती करण्यांत आली आहे.

१९४६ सालीं सरकारनें या कामासाठी एक चौकशी समिति नेमली आणि तिनें जमीन संरक्षणविषयक सर्व कामांचा आढावा घेतला आणि त्याचा परिणाम म्हणून काळ्या कपाशीच्या क्षेत्रांतील ( समितीच्या एका शिफारसीनुसार ) बांधबंदिस्तीचें काम, या जमिनीसाठी योग्य पद्धतीचा शोध लागेपर्यंत थांबविण्यांत आलें. परंतु हलक्या आणि मध्यम मगदुराच्या जमिनींतील हें काम मात्र चालूं राहिलें. आजपर्यंत यापैकीं ५ लाख एकर जमिनीची बांधबंदिस्ती पुरी करण्यांत आली आहे. सुमारें १० लाख एकर जमिनींत जमीन संरक्षणाचें कार्य करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी असून राज्यांत एकूण ५०० लाख एकर क्षेत्रांत हें काम होण्याची जरूरी आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत शेतमालाच्या उत्पादनांत वाढ करून तें ६६० ते ७७० लक्ष टन करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. त्यावेळीं रहाणीचें मान थोडेसें वाढून लोक भरड अन्नधान्यांऐवजीं गहूं आणि कडधान्य वगैरे प्रकारचें वरच्या प्रतीचें धान्य अधिक प्रमाणांत वापरूं लागतील तेव्हां या बाबतींत स्वयंपूर्णता टिकविण्यासाठी या वाढीचा उपयोग होईल. इतर प्रकारच्या पिकांतहि वाढ व्हावी अशी अपेक्षा आहे.

प्रचार आणि शिक्षण या द्वारां सरकार शेतकऱ्यांना बांधबंदिस्ती करण्यास उत्तेजन देत आहे आणि सुदैवानें शेतकऱ्यांनाहि जमीन संरक्षणाच्या दृष्टीनें व धान्योत्पादनांत वाढ करण्याच्या दृष्टीनें या उपाययोजनांचें महत्त्व कळूं लागलें आहे.

### भारतांत नोंदलेल्या व चालू असलेल्या लिमिटेड कंपन्या

( आंकडे कोटी रुपयांचे )

| मार्च अखेर | सर्व कंपन्या | | पब्लिक कंपन्या | | प्रायव्हेट कंपन्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | वसूल भांडवल | संख्या | वसूल भांडवल | संख्या | वसूल भांडवल |
| १९४७–४८ | २२,६७५ | ५७० | ... | ... | ... | ... |
| १९४८–४९ | २५,३४० | ६२८ | ... | ... | ... | ... |
| १९४९–५० | २७,५५८ | ७२४ | ... | ... | ... | ... |
| १९५०–५१ | २८,५३२ | ७७५ | १२,५६८ | ५६७ | १५,९६४ | २०९ |
| १९५१–५२ | २९,२२३ | ८५७ | १२,४१३ | ६०७ | १६,८१० | २४९ |
| १९५२–५३ | २९,३१२ | ८९८ | १२,०५५ | ६२९ | १७,२५७ | २६९ |
| १९५३–५४ | २९,५२८ | ९४५ | १०,२४८ | ६३१ | १९,२८० | ३१४ |
| १९५४–५५ | २९,७७९ | ९८३ | १०,०५९ | ६५६ | १९,७२० | ३२७ |
| १९५५–५६(अंदाज) | ३०,३८१ | १,०१९ | ९,९५४ | ६८४ | २०,४२७ | ३३५ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.